# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांकः20.07.2025 वारःरविवार

---

- संसदेचं उद्यापासून पावसाळी अधिवेशन.

- अन्नप्रक्रिया क्षेत्रात नावीन्य, भागीदारी आणि दीर्घकालीन सहकार्याला चालना देण्यासाठी पुण्यात परिषदेचं आयोजन

- धाराशिव जिल्ह्यात एका दिवसात 15 लाख वृक्षांची लागवड.

- रत्नागिरी आणि पंढरपूर इथं सात जणांचा बुडून मृत्यू.

- आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये भारतीय विद्यार्थ्यांना सहा पदकं आणि

- महिला क्रिकेटमध्ये भारत-इंग्लंड मालिका बरोबरीत

**<u>पावसाळीअधिवेशन</u>**

संसदेचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होत आहे. ते २१ ऑगस्टपर्यंत चालेल. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं आज दिल्लीत सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. अधिवेशनात दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत व्हावं याकरता सरकार या बैठकीत सर्व पक्षांना सहकार्याचं आवाहन करेल. जन विश्वास (तरतुदींमध्ये सुधारणा) विधेयक, राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक आणि व्यापारी जहाज व्यवसाय विधेयक यासह महत्त्वाचे कायदे चर्चेसाठी आणि मंजुरीसाठी घेतले जाण्याची अपेक्षा आहे.

**<u>VC : अन्नप्रक्रिया उद्योग परिषद</u>**

**<u>इंट्रो-</u>**

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर, वैज्ञानिक तसंच औद्योगिक अनुसंधान परिषद आणि केंद्रीय अन्न तंत्रज्ञान संशोधन संस्था यांच्या वतीनं पुण्यात अन्नप्रक्रिया उद्योग परिषदेचं आयोजन करण्यात आलं होतं. अन्नप्रक्रिया क्षेत्रात नावीन्य, भागीदारी आणि दीर्घकालीन सहकार्याला चालना देण्यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण होती. त्याविषयीचा वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून.......

**स्क्रिप्ट :**

अन्नसुरक्षा हे आव्हान असले तरी बदलत्या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आणि नाविन्य पूर्णतेच्या सहकार्याने अन्नसुरक्षा केवळ शक्यच नाही तर त्याची पोषक तत्वेही टिकवण्याची क्षमता नव्या तंत्रज्ञानात आहे याविषयीची परिषद नुकतीच पुण्यात पार पडली. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चर आणि वैज्ञानिक तसेच औद्योगिक अनुसंधान परिषद यांच्या वतीने अन्नप्रक्रिया उद्योग परिषदेमध्ये याविषयी विविध पैलूंवर चर्चा झाली. भारताच्या अन्नप्रक्रिया क्षेत्रात नावीन्य, भागीदारी आणि दीर्घकालीन सहकार्याला चालना देण्यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण होती. सुमारे २५० हून अधिक उद्योजकांचा सहभाग या परिषदेमध्ये होता. अन्न सुरक्षिततेची खात्री करण्याच्या हेतूनं उद्योग आणि शैक्षणिक संस्थांच्या दरम्यान अधिक प्रभावी संवाद आणि सहकार्य आवश्यक आहे, असं मत केंद्रीय खाद्य तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या संचालिका डॉक्टर श्रीदेवी अन्नपूर्णा सिंग यांनी व्यक्त केले . तांत्रिक सहकार्य, क्षमता वाढ आणि संयुक्त संशोधन उपक्रमांसाठी सामंजस्य करार या परिषदेमध्ये करण्यात आला. हा करार उद्योगांसाठी उपयुक्त अशा व्यावसायिक तंत्रज्ञान हस्तांतरणाला चालना देईल. असा आशावाद या परिषदेमधून व्यक्त करण्यात आला . आकाशवाणी बातम्यांसाठी भूषण राजगुरू , पुणे.

**बेटिंग**

अवैध ऑनलाइन प्रकरणाच्या चौकशीच्या पार्श्वभूमीवर सक्तवसुली संचालनालयाने तंत्रज्ञान क्षेत्रातील गुगल आणि मेटा यांना नोटीस बजावल्या आहेत. या दोन्ही कंपन्यांना २१ जुलै रोजी चौकशीसाठी समन्स बजावले आहेत. ईडी सट्टेबाजीशी संबंधित ॲप्समधून कथितपणे झालेल्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी तपास करत आहे.

**कॅरिसूची**

आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागात अस्थायी कॅज्युअल रिपोर्टरची सूचि बनविण्याकरिता परीक्षा घेण्यात येत आहे. या परीक्षेसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख आज आहे. अर्ज करण्यासाठी newsonair.com या संकेतस्थळावरील वेकन्सीज या टॅबला भेट द्यावी. अधिक माहितीसाठी आपण प्रादेशिक वृत्त विभागाच्या 255 10 506 किंवा 255 32 162 या क्र मांकावर देखील संपर्क साधू शकता.

**वॉका-पारंपारीक शेती- सन्मान-सिंधुदुर्ग**

**इंट्रो-**

शेतीमध्ये यांत्रिकीकरण वाढल्याच्या परिणामी नांगरणीसाठी बैलांच्या जोताऐवजी यंत्राचा वापर केला जात आहे. त्यामुळं जोतानं केली जाणारी पारंपरिक शेती हळूहळू कालबाह्य होत आहे. या पारंपरिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात घोटगे गावच्या सरपंच चैताली ढवळ यांच्या संकल्पनेतून जोतानं शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा ग्राम पंचायतीच्यावतीने सन्मान करण्यात येणार आहे. त्याविषयीचा हा वृत्तांत...

**स्क्रिप्ट:**

त्रिकीकरणाच्या युगातसुद्धा शेतकऱ्यांनी आजसुद्धा जनावरांवर असलेल्या प्रेमापोटी आपली जोतं जपून ठेवली आहेत. पण सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात कोकणातल्या शेतीच्या काही जुन्या परंपरा लोप पावत आहेत. पारंपरीक पद्धतीन शेती करण्याची बरीचशी काम करण्यासाठी शेतकरी वेगवेगळ्या यांत्रिकीकरणाचा वापर करू लागला आहे. नांगरणीच्या वेळी जोताच्या बैलांसोबत होणारा संवाद, काही शेतावरची गाणी आता हरवत चालली आहेत. त्यामुळे या पारंपरिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी कुडाळ तालुक्यातल्या घोटगे गावच्या सरपंच चैताली ढवळ यांनी एक नवीन संकल्पना आणली आहे. गावातले जे शेतकरी जोतान पारंपरिक शेती करताहेत त्यांचा येत्या स्वातंत्र्यदिनी शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात येणार आहे. पारंपरिक शेती परंपरा टिकवण्यासाठी सरपंच चैताली ढवळ यांचा हा प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद म्हणावा लागेल. आकाशवाणी बातम्यांसाठी सिंधुदुर्गहून निलेश जोशी.

**पालकशाळा**

**इंट्रो**-

पुण्यातील माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयात काल पालक शाळा हा आगळा वेगळा उपक्रम घेण्यात आला. या माध्यमातून पालकांनी आपल्या काळाप्रमाणं शाळेत जावून शिकण्याचा अनुभव घेतला. याबाबत शाळेचे पालक कौस्तुभ देव यांनी आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त केल्या........

**स्क्रिप्ट :**

एक दिवसाची पालक शाळा हा नाविन्यपूर्ण उपक्रम असून या वर्षीच्या पालक शाळेमध्ये मला सहभागी होता आले. सर्व विषयाच्या शिक्षकांनी आम्हाला मार्गदर्शन केले. काळाबरोबर शाळेमध्ये झालेला हा बदल निश्चितच स्वागतार्ह आहे. वर्गातील खडू फळ्याची जागा आता स्मार्ट बोर्डने घेतली आहे. त्यामुळे शिक्षक आता एखाद्या विद्यार्थ्याची शंका ऑडिओ व्हिज्युअल स्वरुपात दूर करू शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना विषय सोप्या पद्धतीने आणि अचूक

रित्या समजावून सांगता येतोय असे लक्षात आले. या उपक्रमामध्ये पालकांनी आपल्या पाल्याच्या शिक्षणात कसा सहभाग घ्यायचा आहे हेही शिक्षकांनी समजावून सांगितले. तसेच पालक म्हणून आम्हीदेखील काय जबाबदारी पार पाडायला पाहिजे याची परत एकदा उजळणी झाली.पुन्हा पुन्हा अशा पालक शाळेत यायला नक्कीच आवडेल.

**<u>वृक्षलागवड</u>**

धाराशिव जिल्ह्यात एक पेड मा के नाम, हरित महाराष्ट्र हरित धाराशिव या मोहिमेअंतर्गत काल एका दिवसात 15 लाख वृक्षांची लागवड करण्यात आली.  हा एक विक्रमच आहे. जिल्ह्यातील 243 ग्रामपंचायती आणि सर्व नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रामध्ये ५० हेक्टरवर वृक्ष लागवड झाली असून जिल्ह्याचं वनक्षेत्र वाढण्यास मदत होणार आहे.

**<u>प्रग्राआयो</u>**

प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेमध्ये रत्नागिरी तालुक्यात सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायतींच्या श्रेणीत धामणसे ग्रामपंचायतीनं प्रथम, तर चवे आणि गोळप या ग्रामपंचायतींनी अनुक्रमे दुसरा आणि तिसरा पुरस्कार मिळवला. राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनेत कोतवडे ग्रामपंचायतीनं पुन्हा एकदा पहिला क्रमांक मिळवला, तर गावखडी आणि निरुळ या ग्रामपंचायतींना दुसरा आणि तिसरा क्रमांक मिळाला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे यांच्या हस्ते या पुरस्कारांचं काल वितरण करण्यात आलं.

**<u>स्वस</u>**

स्वच्छ सर्वेक्षणाअंतर्गत ३ ते १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये चंद्रपूरनं देशात २१ वा क्रमांक प्राप्त केला आहे. यासोबतच थ्री स्टार सिटी म्हणून शहराला गौरविण्यात आलं आहे. घनकचरा संकलन, प्रक्रिया केंद्रांची गुणवत्ता आणि नागरिकांच्या सहभागामुळं हे यश मिळाल्याची प्रतिक्रिया आयुक्त विपीन पालीवाल यांनी दिली आहे.

**<u>धरणगाव</u>**

जळगाव जिल्ह्यातील रावेर, यावल, अमळनेर, धरणगाव आणि चोपडा या तालुक्यांमध्ये पावसाची सर्वाधिक कमतरता जाणवत असल्यानं शेतकरी अडचणीत आले आहेत. ३८ पैकी १७ महसूल मंडळांमध्ये पावसाची तूट ५० टक्क्यांपर्यंत असून तिथल्या शेतकऱ्यांना दुबार पेरणीचं आव्हान आहे.

**<u>पिके</u>**

वाशीम जिल्ह्यात पुरेसा पाऊस न झाल्यामुळं अनेक जलप्रकल्प भरलेले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचं वातावरण आहे. सध्या प्रकल्पांमध्ये केवळ २० टक्केच जलसाठा झाला आहे.

**<u>एआयपत्रकार</u>**

परभणी इथं पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक भान आणि प्रशासनाशी सुसंवाद दृढ करण्यासाठी जिल्हा निवडणूक विभाग आणि जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीनं कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान कार्यशाळेचं काल आयोजन करण्यात आलं होतं. पत्रकारांच्या लेखणीद्वारेच प्रशासन आणि सामान्य नागरिक यांच्यात संवाद घडतो असं मत जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी यावेळी व्यक्त केलं.

**<u>मृत्यू</u>**

पंढरपूर इथ चंद्रभागा नदीत तीन महिला काल सकाळी स्नान करत असताना बुडाल्या. त्यापैकी जालना इथल्या दोन महिलांचा मृतदेह सापडला असून तिसऱ्या महिलेचा शोध उशिरापर्यंत सुरु होता. स्थानिक कोळी बांधवांच्या मदतीनं मृतदेहांचा शोध घेण्यात आला.

**<u>बुडून मृत्यू</u>**

रत्नागिरी तालुक्यात आरे-वारे इथल्या समुद्रकिनारी गेलेल्या चार जणांचा काल बुडून मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली. त्यात तीन तरुणी आणि एका पुरुषाचा समावेश असून, दोघी जणी ठाणे-मुंब्रा इथल्या आहेत. समुद्र खवळलेला होता, पाऊसही पडत होता, तरीही समुद्राच्या पाण्यात उतरल्यानंतर लाटांचा आणि पाण्याचा अंदाज न आल्यामुळं चौघंही जण बुडाले. स्थानिकांनी आणि किनाऱ्यावरच्या रक्षकांनी त्यांना वाचवण्याचे केलेले प्रयत्न अयशस्वी ठरले.

**<u>ऑलिंपियाड</u>**

ऑस्ट्रेलियात आयोजित सहासष्ठाव्या आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये भारताला ३ सुवर्ण, २ रौप्य आणि १ कांस्य पदकं मिळाली आहेत. महाराष्ट्राच्या आदित्य मांगुडीनं सुवर्णपदक पटकावलं. या स्पर्धेत एकंदर ६३० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता, त्यापैकी ६९ विद्यार्थिनी होत्या. या वर्षी भारतीय संघानं सर्वाधिक २५२ पैकी १९३ गुण मिळवून एक नवीन विक्रम प्रस्थापित केला.

**<u>महिला क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये, इंग्लंडनं काल लॉर्ड्सवर पावसामुळं आखूड झालेल्या पन्नास षटकांच्या दुसऱ्या सामन्यात भारताचा 8 गडी राखून पराभव करत मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. भारतीय महिलांनी 29 षटकांत आठ बाद १४४ धावा केला. यजमान संघाला २४ षटकांत ११५ धावांचं लक्ष्य देण्यात आलं, ते त्यांनी एकविसाव्या षटकात पार केलं. निर्णायक तिसरा सामना मंगळवारी खेळला जाईल.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं , नमस्कार.